




दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २२१ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.१७ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


## विधानसभेप्रमाणे महानगरपालिकेतही परिवर्तन करायचे

# ५ वर्षांत २० वर्षांचा बॅकलॉक भरून काढा

# देवेंद्र फडणवीसांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**वसई (वृत्तसंस्था)–वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित यांच्या भाजप जनसंपर्क कार्यालयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज उद्घाटन पार पडले. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी तयारी करण्याचे आवाहन केले. मागील २० वर्षांचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी विधानसभेत परिवर्तन केले, तसे महापालिकेत करावे लागेल, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना केले आहे.पालघर जिल्ह्यात निवडणुका जिंकल्यानंतर प्रथमच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वसईत दाखल झाले. प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत धरती आबा लोकसहभाग मोहिमेचा जिल्ह्यात शुभारंभ, शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत, वाढवण बंदर चर्चा सभा, बांबू लागवड उपक्रम, वसई विरार महापालिकेच्या सर डीएम पेटिट विस्तारित रुग्णालय, बोळींज पोलिस ठाण्याचे एसीपी, डीसीपी कार्यालयाचे ऑनलाइन प्रणाली द्वारे उद्घाटन अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पालघर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात स्नेहा दुबे पंडित यांच्याही जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन देवेंद्र फडणवीस केले. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्यांनी उपरोक्त आवाहन केले आहे.**

स्नेहा दुबे पंडित यांच्या नेतृत्वात वसई पालघर भागात आपल्याला परिवर्तन घडवायचे आहे. मी असेल, पालकमंत्री गणेश नाईक आम्ही सगळे पूर्ण ताकदीने स्नेहा दुबे पंडित यांच्या पाठीशी उभे आहोत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. पाच वर्षांमध्ये तुमचा गेल्या वीस वर्षांचा बॅकलॉग भरून काढण्याचा निर्णय आम्ही घेतला असल्याचे त्यांनी आश्वस्त केले. यानंतर कार्यकर्त्यांनी देवा भाऊ जिंदाबादच्या घोषणा दिल्या. त्यावर जिंदाबाद म्हणून चालणार नाही. बॅकलॉग भरायचा असेल, तर जसे परिवर्तन विधानसभेत केले, तसे महानगरपालिकेतही करावे लागेल, असे आवाहन फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना केले.

फडणवीस पुढे म्हणाले, तुमच्या परिवर्तनाची गुरूकिल्ली महानगरपालिकेत आहे. ती जो पर्यंत आपल्याकडे येत नाही, तोपर्यंत आपण कितीही स्वप्न बघितली, तर ती दरवाजाजवळ येऊन थांबणार आहेत, ती पुढे जाऊ शकणार नाही. त्यामुळे आता सर्वांनी जोरात कामाला लागा. महानगरपालिकेच्या दृष्टीने पूर्ण ताकदीने उतरा. तिथे देखील परिवर्तन घडवा. तुम्ही महानगरपालिकेत परिवर्तन घडवल्यानंतर पुढील पाच वर्षांत काय परिवर्तन होते ते बघा, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.



### मुंबई पालिकेसाठी शिवसेनेकडूनही तयारी

दरम्यान, आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना देखील तयारीला लागली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी मुंबईतील सेना भवन येथे शाखा प्रमुखांची बैठक पार पडली. येत्या काळात होत असलेल्या निवडणुकीत शिवसेना सोडून गेलेल्या मंडळींना आता त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे. सर्व कार्यकर्त्यांनी अंग झटकून कामाला लागा. त्यासाठी दररोज ३०० घरातील मतदारांची भेट घेण्याचे लक्ष्य ठेवावे. त्यानुसार दिवसभराच्या कामाचे नियोजन करावे. त्यासोबतच पक्षाने केलेले काम या मतदारांची भेट घेऊन त्यांच्यापर्यंत पोचवावा, अशा सूचना उद्धव ठाकरेंनी शाखा प्रमुखांना दिल्या.

# नागरिकांच्या हक्कासाठी

# खा.धानोरकर आक्रमक

## दिशा समितीच्या बैठकीत अधिकाऱ्यांना चपराक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात केंद्र शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असून कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा ठाम इशारा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी अधिकाऱ्यांना दिला. जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समितीच्या बैठकीत त्यांनी विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला आणि अनेक मुद्द्यांवर अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.


जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात ही बैठक पार पडली. यावेळी दिशा समितीचे सहअध्यक्ष खा. डॉ. नामदेव किरसान, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायकुटे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.यावेळी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत



मोठ्या संख्येने शेतकरी अद्यापही विमा भरपाईपासून वंचित असल्याकडे प्रतिभाताई धानोरकर यांनी लक्ष वेधले. पात्र लाभार्थ्यांना तातडीने विमा भरपाई वितरित करण्याचे आदेश त्यांनी दिले. वाढीव दराने विकल्या जाणाऱ्या बियाणे व खत विक्रेत्यांवर कारवाई करून परवाने रद्द करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.जलजीवन मिशन अंतर्गत कंत्राटदारांनी रस्त्यांची दुर्दशा केल्याकडे त्यांनी लक्ष वेधत संबंधित रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करण्याचा आदेश दिला. अंगणवाडी बांधकामे, कुपोषणमुक्तीच्या योजना प्रभावीपणे राबवण्याचा आदेशही त्यांनी दिला. घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू मिळत असली तरी वाहतूक खर्चाचा प्रश्न अद्याप मार्गी न लागल्याचे त्यांनी नमूद केले.

मोबाईल नेटवर्कच्या समस्या, रेल्वे प्रकल्पासाठी भूसंपादनाचा प्रश्न, राष्ट्रीय महामार्गावर प्रवासी निवारा उभारणी, वरोरा–चिमूर महामार्गावरील उंच रस्ता व शेतकऱ्यांचे नुकसान यावरही त्यांनी प्रशासनाला कठोर सूचना केल्या. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.बैठकीत खा. डॉ. नामदेव किरसान यांनीही अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी विभाग प्रमुखांना आवश्यक त्या सूचना दिल्या. उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायकुटे यांनी सादरीकरण व संचालन केले.या बैठकीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, जलजीवन मिशन, प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत मिशन, अमृत योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, खनीज विकास, महानेट, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण, कौशल्य विकास योजना आदी केंद्र प्रायोजित योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

## दक्षिण रायगडमध्ये मुसळधार पावसाचा कहर;जनजीवन विस्कळीत




**रायगड । प्रतिनिधी**

दक्षिण रायगड जिल्ह्यात शनिवारी रात्रीपासून मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली असून, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन आणि पोलादपूर तालुक्यांत अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. प्रादेशिक हवामान विभागाने यापूर्वीच रायगडसाठी रेड अलर्ट जारी केला होता.

वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह कोसळलेल्या पावसामुळे अनेक भागांतील विजेचे पोल कोसळले, झाडे उन्मळून पडली, तर सखल भागात पाणी साचले आहे. जिल्ह्यातील नद्या–नाल्यांचे पाणी भरभराटीला गेले असून, रविवारी सकाळी ८ वाजेपर्यंत २४ तासांत सरासरी ८२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. माणगावात सर्वाधिक १७० मिमी पाऊस झाल्याची नोंद झाली.

**तालुकानिहाय पावसाची नोंद (मिमीमध्ये):**

माणगाव: १७०
म्हसळा: १४५
श्रीवर्धन: १४३
पोलादपूर: १२८
सुधागड: १२६
उरण: ९७
महाड: ८५
मुरुड: ८१
खालापूर: ७१
रोहा: ५१
पनवेल: ४०
तळा: ३९
माथेरान: ३३
कर्जत: १६



जिल्ह्यातील नदी किनाऱ्यावरील व डोंगर उतारांवरील गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. दरम्यान, खालापूर तालुक्यातील नाढाळ येथे एक पर्यटक बुडाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

कोकणात मे महिन्यात सुरू झालेल्या पावसामुळे पेरण्या रखडल्या होत्या. मात्र, सध्या मुसळधार पावसामुळे शेतीस पोषक वातावरण निर्माण झाले असून, शेतकऱ्यांनी पेरण्या व मशागतीची कामे वेगाने सुरू केली आहेत.

## पॅकिंग कंपनीतून ६.८७ लाखांची चोरी; तिघी महिला आणि रिक्षाचालकावर गुन्हा



**सातारा । प्रतिनिधी**

लिंब (ता. सातारा) येथील साई बालाजी पॅकिंग कंपनी मधून तब्बल ६ लाख ८७ हजार रुपये किंमतीचे मशिनचे सुटे भाग व इतर साहित्य चोरी केल्याप्रकरणी तिघीं महिला व एका रिक्षाचालकावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी प्रशांत शामराव मस्के (वय ५०, रा. धावडशी, ता. सातारा) यांनी फिर्याद दिली आहे. संशयित महिला रिक्षातून कंपनीतून मशिनचे सुटे भाग व इतर वस्तू चोरून नेत असताना मस्के यांनी त्यांना रंगेहात पकडले. त्यानंतर पोलीस ठाण्यात कळविण्यात आले.पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन वर्षा राजा गोसावी, मेघा किरण मोरे, सोमवती घाडगे (सर्व रा. सैदापूर) आणि एक अनोळखी रिक्षाचालक यांना ताब्यात घेतले.या चौघांविरोधात चोरीच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास महिला पोलिस हवालदार गायकवाड करत आहेत.

# गुणवत्तापूर्ण शिक्षण हीच भविष्याची गुंतवणूक–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पालघर । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या ‘१०० शाळा भेट’ उपक्रमाअंतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालघर तालुक्यातील पीएम श्री जिल्हा परिषद शाळा, दुर्वेस येथे भेट दिली. नव्या शैक्षणिक वर्ष २०२५–२६ च्या प्रारंभानिमित्त नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे औपचारिक स्वागत करत त्यांनी पाठ्यपुस्तक व गणवेशाचे वाटप केले.विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले, गुणवत्तापूर्ण शिक्षण, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि शिक्षक–पालक यांचा सुसंवाद हीच भविष्यातील समृद्ध शिक्षणव्यवस्थेची किल्ली आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी औषधी वन उद्यानात वृक्षारोपण करत पर्यावरणपूरक संदेश दिला.



मुख्यमंत्र्यांनी डिजिटल क्लासरूम, आय सीटी लॅब, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, औषधी वन उद्यान, टेरेस गार्डन आदी सुविधा पाहून समाधान व्यक्त केले. पीएम श्री योजनेअंतर्गत विकसित झालेली ही शाळा जिल्ह्यातील आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते.मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित पालकांशी थेट संवाद साधून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. पालकांनी समाधान व्यक्त करत सांगितले की, या शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिक्षकांची मेहनत आणि विविध उपक्रमांमुळे मुलांचा सर्वांगीण विकास घडतो. विद्यार्थ्यांना डिजिटल बोर्डाचा वापर करून आधुनिक पद्धतीने शिक्षण दिले जाते.यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी समाधान व्यक्त करत शिक्षक, पालक व शिक्षण विभागाच्या प्रयत्नांचे कौतुक केले. कार्यक्रमास पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार विलास तरे, राजन नाईक, राजेंद्र गावित, पदवीधर आमदार निरंजन डावखरे, शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय. एन. कुंदन, शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सोनाली मातेकर, विविध विभागप्रमुख, शिक्षकवर्ग, मुख्याध्यापिका, पालक, ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.राज्य शासनाच्या ‘१०० शाळा भेट’ उपक्रमाअंतर्गत मुख्यमंत्री पालघर दौऱ्यावर असून, दिनांक १६ व १७ जून २०२५ रोजी जिल्ह्यातील १४२ शाळांना मंत्री, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी भेट देणार आहेत. या उपक्रमामुळे शाळा, विद्यार्थी व पालक यांच्यातील नाते दृढ होत असून, शाळेतील उपस्थिती व शैक्षणिक गुणवत्तेत सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# योग:‘एक पृथ्वी,एक आरोग्य’साठी



डॉ.संजय उगेमुगे
नागपूर

पृथ्वीचे आरोग्य आणि मानवतेचे कल्याण यांच्यातील संबंधाला आजच्या काळात पूर्वीपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. हवामान बदल, पर्यावरणाचा ऱ्हास आणि वाढत्या आरोग्यविषयक समस्यांसारख्या आव्हानांना सामोरे जात असताना, मानवी आरोग्य पृथ्वीच्या आरोग्याशी अविभाज्यरित्या निगडीत असल्याची जाणीव अधिक तीव्रतेने होऊ लागली आहे.एक पृथ्वी, एक आरोग्य हा मंत्र या नात्यावर भर देतो. तो आपल्याला संतुलन, शाश्वतता आणि निसर्गाशी सुसंवाद साधणारी जीवनशैली स्वीकारण्यासाठी उद्युक्त करतो. हा दृष्टिकोन प्रत्यक्षात आणण्यासाठी, प्राचीन काळापासून रुजलेले, कालातीत ज्ञान आणि योग, मदत करतात आणि एक शक्तिशाली व व्यावहारिक मार्ग उपलब्ध करून देतात. योग ही केवळ एक शारीरिक शिस्त नाही तर ती एक जीवनशैली आहे. योगामुळे जागरूकता, शिस्त, करुणा आणि आंतरिक शांतता वृद्धिंगत होते. योगाभ्यासाच्या माध्यमातून व्यक्ती आपल्या शरीराशी, मनाशी, समाजाशी आणि निसर्गाशी सुसंवाद साधायला शिकतो. नियमित योगाभ्यासामुळे आपले विचार, कृती आणि सवयींबाबत सजगता वृद्धींगत होते. ही सजगता योगमॅटच्या पलीकडे जाऊन आपली जीवनपद्धती घडवते. आपण काय खातो, संसाधने कशी वापरतो, इतरांशी कसे वागतो आणि निसर्गाशी आपला संबंध कसा असतो, ही जीवनपद्धतील प्रभाव टाकते.

योगाच्या केंद्रस्थानी असलेली नैतिक तत्त्वे सर्व प्रकारच्या जीवनाबद्दल आदर निर्माण करतात. ‘अहिंसा’ ही योगातील एक मूलभूत संकल्पना आहे. ती आपल्याला शक्य तेथे स्वतःची, इतरांची, प्राण्यांची आणि पर्यावरणाची हानी टाळण्याचे बळ देते. हे तत्त्व प्रामाणिकपणे आचरणात आणल्यास, शाकाहार किंवा वनस्पती-आधारित आहाराला प्रोत्साहन मिळते. प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवरील अवलंबन कमी होते आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून हितकारक आवडी-निवडी अंगीकारण्याची प्रेरणा मिळते. ‘अपरिग्रह’ म्हणजेच आवश्यकतेपुरतेच सेवन. ही संकल्पना अतिसेवन आणि अपव्यय यांसारख्या पर्यावरणीय असंतुलनास कारणीभूत घटकांना रोखण्यास मदत करते.

योग साधेपणा आणि संतुलित जीवनशैलीला प्रोत्साहन देतो. खरे आरोग्य हे अतिरेक, वेग किंवा भौतिक संचयातून नव्हे तर आंतरिक समतोलातून मिळते, हे योग शिकवतो. जेव्हा एखादी व्यक्ती योगाकडे वळते, तेव्हा ती स्वच्छ आहार, अधिक सजग दिनचर्या आणि निरोगी नातेसंबंध स्वीकारते. यामुळे कृत्रिम उत्तेजकांवरील अवलंबन कमी होते, जीवनशैलीशी संबंधित आजारांचा धोका घटतो आणि आरोग्यसेवा व्यवस्थेवरील ताण कमी होतो. परिणामी, आपण निरोगी समाज आणि निरोगी पृथ्वीच्या दिशेने वाटचाल करू लागतो.योगाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तो आपल्याला निसर्गाशी पुन्हा जोडतो. पारंपरिक योगिक तत्वज्ञानानुसार, पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू आणि आकाश हे पंचमहाभूत मानले जातात. सूर्यनमस्कार, चंद्रध्यान, जमिनीशी संपर्क ठेवून केलेली आसने अशा पद्धतींद्वारे योग या घटकांबाबत जागरूकता वाढवतो. जसजसे योगाभ्यासक हे नैसर्गिक चक्र समजून घेतात, तसतशी त्यांच्या मनात पृथ्वी व तिच्या परिसंस्थांबद्दल अधिक आदराची भावना निर्माण होते आणि पर्यावरण-संवर्धनासाठी त्याचे मन अधिक सजग होते.शिवाय, योग मानसिक स्पष्टता व भावनिक लवचिकता वाढवतो. त्यामुळे आजच्या जागतिक संकटांना सामोरे जाण्याची ताकद निर्माण होते. ताणतणाव, चिंता आणि थकवा यांचा सतत भडिमार होत असल्याच्या काळात, आज योग मनाचे व्यवस्थापन करतो, अडचणींमधून मोकळा श्वास घेण्यासाठी आणि आशेने पुढे जाण्यासाठी मदत करणारी साधने पुरवतो. हे मानसिक बळ केवळ वैयक्तिक पातळीवर नव्हे, तर सामाजिक नवोन्मेष, शाश्वत कृती आणि नेतृत्वासाठीही उपयुक्त ठरते.आज जगभरात, भाषा, संस्कृती आणि धर्माच्या मर्यादा ओलांडून, सर्व लोक योगाचा सराव करताना दिसतात. योगाचा हा जागतिक स्वीकार मानवतेला कल्याण आणि पर्यावरणीय सौहार्दाच्या सामायिक दृष्टिकोनाभोवती एकत्र आणण्याची एक अनोखी संधी आहे. विशेषतः आंतरराष्ट्रीय योग दिनी, जेव्हा जगभरातील लाखो लोक योगाभ्यासासाठी एकत्र येतात, तेव्हा ते शांती, आरोग्य आणि एकतेची सामूहिक ऊर्जा निर्माण करतात. या सामूहिक ऊर्जेत केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक व पर्यावरणीय परिवर्तन घडवण्याची क्षमता आहे.एक पृथ्वी, एक आरोग्य हा संदेश केवळ परिषदा किंवा धोरणांसाठी वापरली जाणारी संकल्पना नसून, हे एक जिवंत सत्य आहे. योग हे दररोज आपल्याला जाणीवयुक्त श्वसनक्रिया, नैतिक जीवनशैली आणि सर्व प्रकारच्या जीवनाबद्दल खोल आदर आचरणात आणण्यास मदत करते. योग हे केवळ एक तत्वज्ञान नव्हे तर या विचारांना कृतीत आणण्यासाठीची एक संधी आहे. ही एक शाश्वत देणगी आहे जी आपल्याला स्वतःच्या आणि पृथ्वीच्या कल्याणासाठी सजगपणे जगायला, करुणेने वागायला आणि योग्य उद्देशाने पुढे जायला प्रेरित करते.

## शेणवे हायस्कूलचे सवंगडी २२ वर्षांनी एकत्र;स्नेहमेळाव्यात आठवणींना उजाळा

**रवींद्र धारवणे । ठाणे**

शहापूर तालुक्यातील शेणवे येथील भारतीय समाजोन्नती मंडळ संचलित पद्मश्री अण्णासाहेब जाधव हायस्कूलच्या २००३ मधील दहावीच्या बॅचमधील माजी विद्यार्थी तब्बल २२ वर्षांनंतर रविवारी एकत्र आले. जुन्या मित्रांच्या भेटीत शालेय आठवणींना उजाळा मिळाला आणि वातावरण आनंदमय झाले.शिक्षणानंतर नोकरी, व्यवसाय आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्या सांभाळताना अनेकांनी एकमेकांचा संपर्क हरवला होता. मात्र २०१९ मध्ये नितीन विशे, विष्णू वरकुटे, विलास वरकुटे, अविनाश बागराव आणि गणेश ठाकरे यांनी व्हॉट्सअॅप गट तयार करून पुन्हा सर्वांना एकत्र आणले. या गटाच्या माध्यमातूनच हा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती प्रतिमेला पूजन करून झाली. मुख्याध्यापक किशोर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. शाळेतील माजी शिक्षक खैरनार , ए. एन. पाटील, महाजन आणि म्हात्रे यांचा सत्कार करण्यात आला. वर्तमान शिक्षक पडवळ , कारंडे, शिपाई पादिर, तसेच गावचे उपसरपंच कैलास पडवळ यांचीही उपस्थिती होती.या वेळी २०२५ च्या एस. एस. सी. परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कु. सुप्रिया कुडव (९४.८० टक्के ), कु. युवराज विशे (९१.४०टक्के ), कु. प्रज्ञा विशे (९०टक्के ) या विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.

विष्णू वरकुटे, नितीन भिसे, अविनाश बाबुराव, श्रीमती जयश्री वेखंडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यानंतर माजी शिक्षकांनी मनोगते मांडली. विद्यार्थ्यांनी शाळेसाठी फुलांची रोपे भेट देऊन निसर्ग संवर्धनाचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश बाजीराव यांनी केले. या स्नेहमेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी आदिज्योती पाचघरे, छाया पाचघरे, संगीता विशे, जयश्री पानसरे, परिमल वरकुटे, राजेश विशे, कुमार हजारे आदी माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.शाळेचे ऋण फेडण्यासाठी एकत्र आलो असून यापुढे दरवर्षी अशीच भेट ठेवू, अशी भावना सर्वांनी व्यक्त केली.

## करमाळा ग्रामीण भाजप मंडळातील संघटनात्मक निवडी साठी मुलाखती १७ जूनला

**सोलापूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या करमाळा तालुक्यातील ग्रामीण मंडळातील विविध मोर्चे, सेल व पदांवरील संघटनात्मक निवडांसाठी इच्छुक कार्यकर्त्यांच्या मुलाखती १७ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आल्या आहेत. या मुलाखती भाजपा प्रदेश महिला मोर्चाच्या उपाध्यक्षा व साखर संघ संचालिका रश्मी दिदी बागल यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा येथील त्यांच्या संपर्क कार्यालयात होणार आहेत, अशी माहिती करमाळा ग्रामीण भाजपा मंडळाध्यक्ष सचिन पिसाळ यांनी दिली.



सचिन पिसाळ म्हणाले की, करमाळा तालुक्यातील ग्रामीण मंडळासाठी विविध मोर्चे व सेल यांच्या प्रमुख पदांवर इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांची मुलाखत प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. या मुलाखतीतून पात्र उमेदवारांची निवड करून त्यांची घोषणा करण्यात येईल. कार्यकर्त्यांनी ठरलेल्या वेळेत उपस्थित राहावे.त्यांनी पुढे सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, तसेच महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांच्या नेतृत्वात करमाळा तालुक्यात भाजपाची संघटनात्मक वाटचाल गतिमान झाली आहे. त्यामुळे अनेक कार्यकर्ते पक्ष संघटनेत सक्रियपणे सहभागी होण्यास इच्छुक आहेत.मुलाखतीनंतर उमेदवारांची यथोचित निवड करून संघटनात्मक नियुक्त्या जाहीर करण्यात येतील. इच्छुक कार्यकर्त्यांनी ही संधी साधत निश्चित वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहनही पिसाळ यांनी केले.

### दातर्ती जिल्हा परिषद शाळेत नवागत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात

## आ.मंजुळाताई गावित व जिल्हाप्रमुख तुळशीराम गावित यांच्या हस्ते पुस्तके व गणवेश वाटप

**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील दातर्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता इयत्ता पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव अत्यंत उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या आवारात फुलांच्या रांगोळ्या, पताकांनी सजावट करून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. बालकांना पुष्पगुच्छ, मिठाई, तसेच नवीन गणवेश व मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार मंजुळाताई गावित यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तुळशीराम गावित उपस्थित होते. माजी पंचायत समिती सदस्य बाळू टाटिया, सरपंच चंद्रकला चौधरी, माजी उपसरपंच योगेश पवार, सोसायटीचे चेअरमन एकनाथ सुर्यवंशी, शिक्षण विस्तार अधिकारी झाल्टे , केंद्रप्रमुख चव्हाण , तसेच शाळेचे मुख्याध्यापक मधुकर पाटील व शिक्षकवृंद कार्यक्रमात सहभागी झाले होते.यावेळी आमदार मंजुळाताई गावित म्हणाल्या, गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार रुजविणे ही काळाची गरज आहे. शिक्षकांच्या प्रयत्नात पालकांनीही सहभाग घेतल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या शिखरावर पोहोचतील.


जिल्हाप्रमुख तुळशीराम गावित यांनी आपल्या भाषणात शाळा ही विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया असून, त्यावरच त्यांचे भविष्य उभे राहते,असे सांगत शिक्षकांच्या कार्याचे कौतुक केले.प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने शाळेच्या परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी रंगीत पोशाख परिधान करून बालगीत, देशभक्तीपर गीतांद्वारे कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, या कार्यक्रमात आमदार गावित यांच्या हस्ते वृक्षारोपण देखील करण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक मधुकर पाटील व शिक्षकवृंदांनी परिश्रमपूर्वक केले. त्यांच्या प्रयत्नातून नवागत विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आत्मीयता व आत्मविश्वास निर्माण झाला. पालकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले.अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेत चैतन्य निर्माण होत असून, शाळेच्या शिक्षक व व्यवस्थापन समितीचे याबद्दल विशेष कौतुक होत आहे.

## साक्री तालुक्यातील प्रतापपूर गावातील ‘जय भद्रा’ संस्थेच्या सेवाकार्याची शिक्षणमंत्र्यांकडून दखल

### ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी समर्पित कार्य शिक्षणमंत्र्यांच्या दारात पोहोचले!

**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील प्रतापपूर येथील ‘जय भद्रा’ सेवाभावी संस्थेच्या प्रेरणादायी कार्याची आज थेट राज्याच्या शालेय शिक्षणमंत्री मा. दादाजी भुसे यांनी दखल घेतली. धुळे जिल्हा परिषद शाळा तुंगत दिगर येथे शिक्षणमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर ही बाब घडली.



या भेटीदरम्यान गावात उत्साहाचे आणि आत्मिक समाधानाचे वातावरण दिसून आले. यावेळी शिवसेना धुळे जिल्हा सहसंपर्कप्रमुख विशाल बापू देसले आणि संस्थेच्या संस्थापिका व प्रेरणादायिका सौ. ज्योती गांगुर्डे यांनी शिक्षणमंत्र्यांसमोर अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने संस्थेच्या कार्याची सविस्तर माहिती सादर केली.‘जय भद्रा’ संस्था ग्रामीण भागातील वंचित, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर असलेल्या विद्यार्थ्यांसाठी गेल्या काही वर्षांपासून कार्यरत आहे. शैक्षणिक साहित्य वाटप, टॅलेंट शो, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, वाचन संस्कृतीचा विकास, मुलींसाठी विशेष उपक्रम अशा माध्यमातून ही संस्था परिसरात सकारात्मक परिवर्तन घडवते आहे.

विशेष म्हणजे, या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असून, पालकांमध्येही शिक्षणाविषयी सकारात्मक मानसिकता वाढीस लागली आहे. या कार्याचे सखोल विवेचन करताना विशाल देसले आणि ज्योती गांगुर्डे यांनी संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या वाटचालीतील अडचणी, संघर्ष, स्वयंप्रेरणा आणि जनसहभाग यावर प्रकाश टाकला.शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी संस्थेच्या कार्याचे भरभरून कौतुक करत, राज्यात अशा उपक्रमांची अत्यंत गरज आहे. असे प्रतिपादन केले.

गावकुसाबाहेरच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेली ही चळवळ आज शासनाच्या दारात पोहोचली, हा आमच्या कार्याचा आणि सामाजिक बांधिलकीचा सर्वोच्च अभिमानाचा क्षण आहे, असे ज्योती गांगुर्डे यांनी भावनिक शब्दांत सांगितले.या भेटीमुळे जय भद्रा संस्थेच्या कार्याला राज्यस्तरावर नव्या उंचीवर नेणारा महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला आहे. ग्रामीण भागातील शिक्षणासाठी समर्पित सेवाभावाचे हे कार्य इतरांसाठीही निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## शंकरपूर परिसरात आठवडाभर शेती वीज पुरवठा ठप्प; शेतकरी संकटात

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यात आठ दिवसांपूर्वी आलेल्या वादळी पावसामुळे अनेक गावांत झाडे कोसळली, घरांचे नुकसान झाले, विजेचे पोल आणि तारांमध्ये मोठा अपघात झाला. या संकटानंतर महावितरण विभागाने गावातील घरगुती वीज पुरवठा पूर्ववत केला असला तरी शेतीसाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा अद्यापही सुरू झालेला नाही. त्यामुळे शंकरपूर परिसरातील शेतकऱ्यांचे खरिप हंगामातील श्रम वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

शंकरपूरसह जवळील जवराबोडी, साठगाव, हिवरा वाकरला, कोलारी, चिचाळा (कुणबी) या गावांतील शेतकऱ्यांना गेल्या आठ दिवसांपासून शेतीसाठी वीज मिळत नसल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक शेतकऱ्यांनी धान, सोयाबीन, कापूस यासारख्या पिकांच्या पेरण्या पूर्ण केल्या असून पावसाने खंड दिल्याने सिंचनासाठी मोटारीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना पाणी देता येत नाही. परिणामी, पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत.या प्रश्नाकडे महावितरणने अद्याप लक्ष दिले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. शेतीच्या वीज पुरवठ्याच्या तातडीने सुरळीततेसाठी अध्यक्ष कृषी शेतकरी मित्र कमलाकर ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाप्रमुख शुभम मंडपे यांनी महावितरणच्या शंकरपूर शाखेतील अभियंता



खोब्रागडे यांना निवेदन दिले असून, शेतकऱ्यांची तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे.शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पाणी असूनही पिकांना वाचवता न येणे ही दुर्दैवी गोष्ट आहे. महावितरणने तत्काळ शेती वीज पुरवठा सुरळीत न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला जाऊ शकतो.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निलजच्या नवीन इमारतीचे उद्‌घाटन सरपंच अंकुश शिंदे यांच्या हस्ते

**सोलापूर । प्रतिनिधी**

मौजे निलज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या नव्याने बांधलेल्या इमारतीचे उद्धाटन आज नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी ग्रामपंचायत पोथरे-निलजचे सरपंच अंकुश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक शिवाजीराव काकडे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी सरपंच अंकुश शिंदे होते. प्रास्ताविक भाषणात काकडे सरांनी शाळेच्या गेल्या दोन वर्षांच्या प्रगतीचा लेखाजोखा सादर केला. विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये झालेली वाढ आणि अभ्यासातील सुधारणा अधोरेखित करताना, त्यांनी इयत्ता पहिलीतील विद्यार्थी सिद्धेश तात्यासाहेब गायकवाड याला पाढे म्हणून दाखवायला सांगितले. त्याच्या उजळ उत्तरे पाहून उपस्थित सरपंच व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.




कार्यक्रमात विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन रामदास गायकवाड आणि राजेश गायकवाड यांनी आपली मनोगते व्यक्त केली. नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत पावलांच्या ठशांद्वारे करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पुंडलिक गायकवाड, सदस्य अनिल गायकवाड, अविनाश गायकवाड, वैजिनाथ भोसले, तात्यासाहेब लोखंडे, दत्तात्रय गरड, गोरख लोखंडे, विजय गायकवाड, मोतीराम गायकवाड, कर्मचारी सुनील जाधव, बबन भालेराव, नवनाथ नाळे, सोमनाथ गायकवाड आदी मान्यवर तसेच बहुसंख्य पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन काकडे यांनी केले तर आभार प्रदर्शन जाधव सर यांनी मानले.

## राज्यात मान्सूनची वेगाने आगेकूच:अनेक जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**-मान्सूनचा वेग पुन्हा वाढल्यामुळे २५ जूनपर्यंत दिल्लीसह वायव्य भारतातील बहुतांश भागांमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. हवामान विभागानुसार १८ जूनपर्यंत मान्सून मध्य आणि पूर्व भारतातील उर्वरित भागांमध्ये तसेच वायव्य भारतातील काही भागांमध्ये पोहोचेल. त्यानंतर १९ ते २५ जून दरम्यान हा वायव्य भारतातील बहुतांश भाग व्यापेल. रखडलेला मान्सून महाराष्ट्रातही सक्रिय झाला आहे. पुढील ४८ तासांत मान्सून संपूर्ण विदर्भ व्यापणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. कोकणात अति मुसळधार, मध्य महाराष्ट्रात मुसळधार तर मराठवाडा व विदर्भात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला.दक्षिण-पश्चिम मान्सूनने महाराष्ट्रात दमदार प्रवेश केला असून, कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या चारही विभागांत पावसाने चांगली हजेरी लावली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, जूनच्या दुसऱ्या आठवड्यात मान्सूनने राज्यात वेगाने आगेकूच केली असून अनेक जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. शेतकऱ्यांसाठी ही दिलासादायक स्थिती मानली जात आहे.पुढील दोन दिवसांत महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात विजांच्या कडकडाटासह मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर परिसरात पावसाच्या सरी कायम राहतील. विदर्भात काही भागांत यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पावसामुळे पेरणीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

# धामणगाव तालुक्यात ७० कृषी केंद्रांची तपासणी

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या आदेशानुसार एक दिवस बळीराजासाठी हे विशेष अभियान शुक्रवार, १३ जून रोजी राबविण्यात आले. या अभियानांतर्गत धामणगाव रेल्वे तालुक्यातील तब्बल ७० कृषी निविष्ठा केंद्रांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली.अभियानाचे उद्दिष्ट म्हणजे कृषी केंद्रांमध्ये नियमबाह्य विक्री, वस्तूंची अनुपलब्धता असूनही शेतकऱ्यांना नकार देणे, बियाणे व खते यांची एमआरपीपेक्षा जास्त दराने विक्री, तसेच लिंकींगसारख्या प्रकारांवर नियंत्रण ठेवणे हे होते.या तपासणीसाठी तालुकास्तरावर समिती गठीत करण्यात आली होती. त्यामध्ये तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी अधिकारी पंचायत समिती यांचा समावेश होता. याशिवाय ग्राम महसूल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी मंडळ अशा





विविध पातळीवरील अधिकाऱ्यांची नेमणूक प्रत्यक्ष कृषी केंद्रांवर तपासणीसाठी करण्यात आली होती.

**पथकांना खालील बाबींवर विशेष भर देण्याचे आदेश देण्यात आले होते:**

कृषी केंद्राचे नाव फलक, परवाना, दरसूची फलक ठळक व दर्शनी भागात आहेत का?. केंद्रामध्ये सीसीटीव्ही आहे का?.शेतकऱ्यांना पावती दिली जाते का? पावतीवर शेतकऱ्याची सही घेतली जाते का? बियाणे, खते व कीटकनाशके ही उत्पादने बिलबुकसह प्रमाणित आहेत का?. शेतकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे का?. तालुकास्तरीय भरारी पथकाचे नाव व मोबाईल क्रमांक केंद्रावर प्रदर्शित आहेत का? .विभागाच्या लिंकींग तक्रार निवारण पोस्टरचे प्रदर्शन झाले आहे का? . तपासणीदरम्यान कृषी केंद्रावर येणाऱ्या शेतकऱ्यांना 'ग्रिस्टॉक' योजनेची माहिती देऊन 'फार्मर आयडी' नोंदणीसाठीही प्रोत्साहित करण्यात आले.अहवाल अद्याप प्राप्त नसल्याने या सर्व केंद्रांमध्ये नियमांचे काटेकोर पालन झाले की केवळ औपचारिकता म्हणून तपासणी झाली, हे स्पष्ट झालेले नाही.

## मोहनबाबू अग्रवाल यांच्या वाढदिवसानिमित्त देवळीत भव्य आरोग्य शिबिर व सामाजिक उपक्रमांचे आयोजन

### १९ जून रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडणार


**देवळी । प्रतिनिधी**

आजच्या यांत्रिक युगात जिथे परोपकाराची भावना दिवसेंदिवस कमी होत चालली आहे, अशा काळातही सामाजिक बांधिलकी जपत समाजासाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणारे ज्येष्ठ समाजसेवक व उद्योजक मोहनबाबू अग्रवाल यांच्या वाढदिवसानिमित्त १९ जून रोजी देवळी येथील श्यामसुंदर मन्नालाल अग्रवाल धर्मशाळेच्या सभागृहात सकाळी १० वाजता विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या उपक्रमांत निशुल्क सर्व रोग निदान व उपचार शिबिर, वृक्षारोपण, तसेच दहावी व बारावी परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा यांचा समावेश आहे. या कार्यक्रमाचे आयोजन ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरम व गायत्रीदेवी अग्रवाल सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार राजेश बकाणे यांच्या हस्ते होणार असून, माजी खासदार रामदास तडस अध्यक्षस्थानी राहणार आहेत. या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतीश अंभोरे, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी संजय इंगळे तिगांवकर, ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. अनिलकुमार दक्ष, वर्धा जिल्हा होमिओपॅथी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. दत्ता कुंभारे आणि मोहनबाबू अग्रवाल स्वतः प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमात भाग घेण्यासाठी देवळी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## श्री संत लोटांगण महाराज प्रासादिक दिंडीचे पावन प्रस्थान–आ.राजेश बकाने यांनी घेतले पालखीचे दर्शन

**वर्धा । प्रतिनिधी**

आषाढ महिन्याच्या वारीसाठी श्री संत लोटांगण महाराज प्रासादिक दिंडीचे आज वर्धा शहरातील श्री संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर, आर्वी नाका येथून पावन प्रस्थान झाले. गौळ (तालुका देवळी) येथील या दिंडीचे आयोजन श्री संत लोटांगण महाराज संस्थान व दिंडी मंडळ, शेगाव नाका पंढरपूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.या वेळी देवळीचे आमदार राजेश बकाने यांनी पालखीचे दर्शन घेतले व वारीस शुभेच्छा दिल्या. वारकऱ्यांशी संवाद साधताना आमदार बकाने म्हणाले, वारी ही भक्ती,



सामाजिक ऐक्य आणि संतांचे विचार पिढ्यान् पिढ्या पोचवणारी परंपरा आहे.


दिंडीमध्ये हरिपाठ, नामस्मरण, कीर्तन आणि पालखी पूजन करण्यात आले. ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोषात भगवे झेंडे फडकवत वारकरी आळंदीच्या दिशेने मार्गस्थ झाले. यावेळी जयंत येरावार, अतुल तराळे, दुर्गेश पांडे, निलेश व अमोल कसनारे आदी उपस्थित होते.वारकऱ्यांसाठी आरोग्य, भोजन आणि निवासाची व्यवस्था नियोजनबद्ध करण्यात आली असून, प्रशासनाचेही सहकार्य लाभत आहे. भक्तिभावाने पार पडणारा हा अध्यात्मिक सोहळा वर्धा जिल्ह्यातील नागरिकांसाठी मोठे आकर्षण ठरत आहे.

## साहित्य निर्मिती ही समाजसेवाच–संजय गाते

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

साहित्य हा समाजाचा आरसा आहे. साहित्य निर्मितीतून संस्कृती, राष्ट्रीय एकात्मता, बंधुत्व व समाजकार्याची जाणीव निर्माण होते. साहित्यसेवेतून समाजसेवा घडते. नवोदित साहित्यिकांनी समाजाला प्रेरणादायी विचार साहित्यातून मांडावेत, असे प्रतिपादन भाजपाचे वर्धा जिल्हाध्यक्ष संजय गाते यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचारमंच, रत्नागिरी (राज्यज) व वर्धा जिल्हा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य राज्यस्तरीय कविसंमेलन व पुस्तक लोकार्पण सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. अनिस बेग यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी भावना खोब्रागडे (सहसंस्थापक, डि.बी.ए.) उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गजानन सयाम, अनिल मडावी, सोपानदेव मशाखेत्री, अजय गावंडे, प्रदीप नागपूरकर, विनोद विटाळे, भूषण पिसे, प्रभाकर कोळसे, महादेवराव शिडामे आणि कविसंमेलन अध्यक्ष प्रा. अभय दांडेकर मंचावर उपस्थित होते.महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात





झाली. संजय गाते यांची भाजप वर्धा जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. उद्घाटन सत्रात कवी योगिराज मनोहर कोचाडे यांच्या समर्थन काव्यसंग्रहाचे व सौ. निलिमा शंकर मोहमारे यांच्या आकाशी झेप काव्यसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थितांनी दोन्ही कवींना पुढील साहित्यप्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. दोघांचा सहपरिवार सत्कार आदिवासी समाजाच्या वतीने अनिल मडावी व महादेवराव शिडामे यांनी केला. अध्यक्षीय भाषणात भावना खोब्रागडे यांनी डि.बी.ए. साहित्यिक विचारमंचाच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकत नवोदित लेखकांना प्रोत्साहन देण्याचे आश्वासन दिले. प्रकाशनाच्या माध्यमातून दर्जेदार साहित्य समाजापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. द्वितीय सत्रा प्रा. अभय दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कविसंमेलन पार पडले. राज्यभरातून आलेल्या कवींनी विविध सामाजिक, प्रेरणादायी व परिवर्तनवादी कविता सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. सौ. राजश्री विरुळकर यांच्या कविता विशेष चर्चेचा विषय ठरल्या. सर्व सहभागी कवींना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमात सादर झालेल्या आदिवासी नृत्यांनी देखील रसिकांची वाहवा मिळवली. कविसंमेलनाचे हे २९वे वर्ष होते. कविसंमेलन अध्यक्ष प्रा. अभय दांडेकर यांनीही आपल्या रचनांची रसिकांसमोर सादरीकरण करत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवि ताकसांडे, प्रभाकर दुर्ग व आम्रपाली पारवे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगिराज कोचाडे, शंकर मोहमारे, सौ. निलिमा मोहमारे, सोनाली फरदे, संतोष भोयर, साक्षी बावणे, वंशिका मेश्राम व डि.बी.ए. साहित्यिक विचारमंचाच्या सर्व सदस्यांनी मेहनत घेतली. आभारप्रदर्शन योगिराज कोचाडे (जिल्हाध्यक्ष, डि.बी.ए. साहित्यिक विचारमंच, वर्धा) यांनी केले

## कै.नामदेवराव जगताप उर्दू शाळेत पहिली च्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्पांनी जंगी स्वागत

### शंभर टक्के निकाल देणाऱ्या शाळेत नवशिक्यांना आनंदात प्रवेश



**सोलापूर । प्रतिनिधी**

शाळेच्या पहिल्या दिवशी कै. नामदेवराव जगताप उर्दू शाळा, सोलापूर येथे नवख्यांचा उत्साहात स्वागत करण्यात आले. पहिली वर्गात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

या स्वागत कार्यक्रमाला माजी नगरसेवक संजय सावंत, फारुक जमादार, रविंद्र कांबळे, दिपक सुपेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर नालबंद, मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर, तसेच पालक आणि शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.कै. नामदेवराव जगताप उर्दू शाळेचा गौरवशाली इतिहास असून ही शाळा गेल्या शंभरहून अधिक वर्षांपासून गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहे. इयत्ता पहिलीपासून दहावीपर्यंतचे वर्ग असलेल्या या शाळेची चालू वर्षीची दहावीची बॅच शंभर टक्के निकालासह यशस्वीरीत्या बाहेर पडली आहे.

या कार्यक्रमास प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, लिपिक शिवदास कोकाटे, तसेच इतर शिक्षक व पालक यांचीही उपस्थिती लाभली.कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर यांनी सर्वांचे आभार मानले.

## पुलगाव रेल्वे फाटक बंद;शहरातील नागरिकांचा उद्रेक–आंदोलनाचा इशारा

**पुलगाव । प्रतिनिधी**

अनेक दिवसांपासून बंद असलेले रेल्वे गेट क्र. डउ–८० पुर्ववत सुरु करण्याची मागणी करत पुलगाव शहरातील नागरिकांनी आवाज उठवला आहे. माजी नगराध्यक्ष मनीष साहू यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे प्रशासनाला यासंदर्भात निवेदन देण्यात आले असून, ८ दिवसांत निर्णय न झाल्यास रास्ता रोको व रेल रोको आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मनोज वसु, काँग्रेसचे शहराध्यक्ष सुनील ब्राह्मणकर, जिल्हा उपाध्यक्ष रमेश सावरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुलगाव–आर्वी मार्गावरील गेट बंद केल्यामुळे आरोग्यसेवा, बाजारपेठ व दळणवळण यावर गंभीर परिणाम होत असून दिवसाला ५ ते ६ किमी अतिरिक्त प्रवास करावा लागत आहे. यामुळे रुग्ण व गर्भवती महिलांच्या जीवितास



धोका निर्माण होत आहे.

पूर्वी हे गेट ट्रेन गेल्यानंतर काही वेळासाठी उघडले जात होते, त्यामुळे कोणतीही अडचण नव्हती. मात्र, अंडरपासच्या कामामुळे गेट बंद करून ठेवल्याने नागरिकांचे हाल सुरू आहेत. अंडरपासच्या कामासाठी खोदलेला खड्डाही आता तांत्रिक कारणांमुळे बंद करण्यात आला आहे. जोपर्यंत नवीन अंडरपास किंवा ओव्हरब्रिज पूर्ण होत नाही, तोपर्यंत गेट पूर्ववत सुरु करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.या निवेदन प्रसंगी बसपा नेते राजाभाऊ लोहकरे, प्रमोद घालनी, नीरज साहू, प्रफुल्ल कुंबरे, रमेश शर्मा, गजानन पचारे, अविनाश सांगोले, रवी केशरवानी, प्रणय खंडागले, अशोक काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## मीडियाच्या आवाजानंतर अखेर जागा झाला वन विभाग;'छोटा मटका' वाघावर जंगलातच उपचार सुरू

**चिमूर । शेषराव राऊत**

ताडोबाच्या बफर भागात गंभीररित्या जखमी झालेल्या 'छोटा मटका' या प्रसिद्ध वाघाच्या नशिबावर गेल्या तीन आठवड्यांपासून वनविभाग गप्प होता. तो उपाशी असून, त्याच्या पायाची जखम वाढून सडण्याच्या मार्गावर आहे, याकडे अनेक पर्यटक आणि वन्यजीव अभ्यासकांनी लक्ष वेधले होते. मात्र, मीडियाने या प्रकरणाची ठळकपणे दखल घेतल्यानंतर अखेर वनविभागाला जाग आली आणि शुक्रवारी या रणवीर वाघावर जंगलातच उपचार करण्यात आले.

'छोटा मटका' व 'ब्रम्हा' या दोन नर वाघांमध्ये काही आठवड्यांपूर्वी भीषण संघर्ष झाला. त्यात 'ब्रम्हा'चा मृत्यू झाला तर 'छोटा मटका' गंभीर जखमी झाला. त्याच्या पायाला खोल चिरा असून तीन आठवड्यांपासून त्याला नीट



चालता येत नव्हते. तो वारंवार रक्ताळलेल्या अवस्थेत दिसत होता. मात्र, वनविभागाने उपचाराऐवजी त्याला निसर्गाच्या भरवशावर सोडून दिले होते.

जखम अतिशय गंभीर झाल्याने त्याच्यावर उपचार करणे टाळल्यास पाय सडण्याचा आणि त्याचा मृत्यू होण्याचा धोका निर्माण झाला होता. अखेर पर्यटक, अभ्यासक आणि माध्यमांच्या सततच्या पाठपुराव्यानंतर वनविभागाने जंगलातच त्याच्या अधिवासात उपचार करण्याचा निर्णय घेतला.र्वीही 'छोटा मटका'ने दोन वाघांशी संघर्ष करून त्यांना यमसदनी पाठवले असून तो अत्यंत धाडसी मानला जातो. मात्र यावेळी त्याच्या शरीरावर फार मोठे जखम झाल्याने तो आठ दिवस उपाशी राहिला होता. अलीकडेच त्याला आयते खाद्य पुरवले गेले.मध्यप्रदेशातील कान्हा व्याघ्र प्रकल्पात 'ज्युनिअर बजरंग' आणि प्रसिद्ध 'कॉलरवाली' वाघिणीवर अशाच पद्धतीने जंगलातच उपचार करण्यात आले होते. तशीच प्रक्रिया आता ताडोबात 'छोटा मटका'साठी लागू करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र राज्य डिजिटल मिडिया जत तालुका पत्रकार संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

**जत । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य डिजिटल मिडिया पत्रकार संघटनेची बैठक जत येथे संपन्न झाली. प्रदेशाध्यक्ष राजा माने यांच्या मार्गदर्शनाखाली नूतन पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत यांच्या हस्ते देण्यात आले.यावेळी सांगली जिल्हा अध्यक्ष मनोहर पवार,जिल्हा कार्यकारिणीवर ज्येष्ठ पत्रकार नजीर चट्टरगी यांच्या निवडीची घोषणा राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत यांनी केली.यावेळी पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर बैठकीत संघटनेच्या विविध कामकाजाचा आढावा घेण्यात आला. पत्रकारांसमोरील आव्हाने, स्थानिक



प्रश्नांवरील माध्यमांची भूमिका, तसेच एकसंधपणे कार्य करण्यासाठी संघटनेच्या पुढील योजनेबाबत चर्चा झाली.या बैठकीदरम्यान नूतन जिल्हाध्यक्ष मनोहर पवार व नूतन तालुकाध्यक्ष प्रकाश करगणिकर व इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे नियुक्ती पत्रे देण्यात आली. राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत यांनी नविन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत पत्रकारितेतील जबाबदारीबाबत मार्गदर्शन केले.संघटनेच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत निष्पक्ष व निर्भीड पत्रकारिता करण्याचा निर्धार करण्यात आला.संघटनेच्या जत तालुका उपाध्यक्ष पदी तानाजी कदम,अजित सनदी तर खजिनदारपदी भागवत काटकर,संपर्क प्रमुख संजय कोटगोंड,विठ्ठल हेगडे,सचिव प्रमोद मेटकरी ,सहसचिव महमंद शेख, आदींच्या निवडी झाल्या.यावेळी पत्रकार अमोल कुलकर्णी, विश्वनाथ तळसंगी,के .अजितकुमार,गोविंद निकम,संतोष गुनकी, प्रभाकर गायकवाड यांच्यासह तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते. दरम्यान या कार्यक्रमानंतर सामाजिक कार्यकर्ते मोहन मानेपाटील, डॉ. शफिक इनामदार, बंडू शेख आदींनी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. आभार प्रकाश करगणिकर यांनी मानले.

### विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ

## पतीसह चौघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**सातारा । प्रतिनिधी**

पती व सासरच्यांकडून माहेरहून एक लाख रुपये आणण्यासाठी विवाहितेवर सतत मानसिक आणि शारीरिक छळ केला गेला. तिला मारहाण व शिवीगाळही करण्यात आली. या प्रकरणी पतीसह चौघांविरुद्ध सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



प्रगती राहुल तुपे (वय २२, रा. असू, ता. फलटण) यांनी याप्रकरणी फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, सासरच्या मंडळींनी जागा विकत घेण्यासाठी माहेरहून एक लाख रुपये आणण्याचा तगादा लावला. त्यासाठी वारंवार शारीरिक आणि मानसिक छळ केला. शिवाय, तिच्यावर मारहाण करून शिवीगाळ करण्यात आली.या फिर्यादीवरून पोलिसांनी पती राहुल अशोक तुपे, सासरे अशोक नारायण तुपे, दीर रोहित अशोक तुपे (सर्व रा. असू, ता. फलटण) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार गुरव करीत आहेत.

# छ.संभाजीनगर येथे विभागीय पत्रकार भवन उभारण्यासाठी शासन जागा उपलब्ध करून देणार-मंत्री संजय शिरसाट

## भारतीय माध्यम क्षेत्र अधिक सक्षम व्हावे-मंत्री अतुल सावे

### राज्यकर्ते आणि प्रसारमाध्यम यांचे संबंध अंबटगोड असावे तरच लोकशाही टिकेल-अशोक वानखेडे

### रौप्य महोत्सवी विभागीय अधिवेशन ऐतिहासिक ठरले; मराठवाड्यातील पत्रकारांना मिळाली नवसंजीवनी

### पत्रकार संघटना ही पत्रकारांना आधार देण्यासाठीच-प्रदेश संघटक संजय भोकरे

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठवाड्याचे विभागीय केंद्र असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय पत्रकार भवन उभारण्यासाठी शासन जागा उपलब्ध करून देईल व हे अद्ययावत भवन बांधण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील, असे आश्वासन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री व संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या मराठवाडा विभागाच्या वतीने संत एकनाथ रंगमंदिर येथे आयोजित रौप्य महोत्सवी विभागीय अधिवेशनात ते बोलत होते.यावेळी बोलताना मंत्री अतुल सावे यांनी, पत्रकारांनी केलेले वार्तांकन हे वाचकांच्या ज्ञानात भर घालणारे असते. त्यामुळे भारतीय माध्यम क्षेत्र अधिक सक्षम व्हावे,अशी अपेक्षा व्यक्त केली.

राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे यांनी स्पष्ट मत मांडत सांगितले की, राज्यकर्ते आणि प्रसारमाध्यम यांचे संबंध अंबटगोड असले पाहिजेत. हे संबंध फार गोडही नसावेत आणि फार अंबटही नाहीत. यामुळेच लोकशाही टिकून राहते.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष व प्रदेश संघटक संजय भोकरे म्हणाले, पत्रकार संघटना ही पत्रकारांचे प्रश्न सोडवणारी व त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारी संस्था आहे. लेखणीच्या माध्यमातून असे कार्य करा, जेणेकरून पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळेल.संत एकनाथ रंगमंदिर येथे भरलेले हे विभागीय अधिवेशन ऐतिहासिक ठरले. यावेळी उपस्थित असलेले अनेक दिग्गज मान्यवर आणि पत्रकारांनी परिसंवादातून परखड मते मांडली. पहिल्या सत्रात 'पत्रकारांचा डीएनए कोणता?' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. परिसंवादाचे उद्घाटन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते झाले. परिसंवादात राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक, ज्येष्ठ पत्रकार मधुकर अण्णा वैद्य, विधिज्ञ ॲड. महेश भोसले, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, माजी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ विश्वास आरोटे,यांनी सहभाग घेतला. परिसंवादाचे समन्वयन



अश्विनी सातव-डोके यांनी केले.यावेळी माध्यम क्षेत्रातील बदल, ग्रामीण पत्रकारांची होणारी मुस्कटदाबी, जाहिरातीसाठी होणारे अतिक्रमण, ब्रेकिंग न्यूजच्या हव्यासामुळे वाढणाऱ्या अपप्रवृत्ती आदी मुद्द्यांवर साधकबाधक चर्चा झाली. या कार्यक्रमाला सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, मंत्री अतुल सावे, आमदार संजय किनीकर, आमदार प्रदीप जयस्वाल, माजी महापौर नंदकुमार घोडेले, मनपाचे आयुक्त जी. श्रीकांत, प.पू. १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज, महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाचे अध्यक्ष जयदीप कवाडे आदींसह राज्यभरातील मान्यवर पत्रकार उपस्थित होते. अधिवेशनात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना मराठवाडा भूषण २०२५ या पुरस्काराने गौरविण्यात आले. यामध्ये वरिष्ठ सनदी अधिकारी जी. श्रीकांत, भाजप शहराध्यक्ष किशोर शितोळे, हास्य अभिनेता योगेश शिरसाट, संपादक शेख मुजीब, मधुकर अण्णा वैद्य, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे आदींचा समावेश होता. संजय भोकरे म्हणाले की, पत्रकारांचे सामाजिक दायित्व अत्यंत महत्वाचे आहे. पत्रकारांनी चांगल्या कार्याचा देखील गौरव करायला हवा. कोरोना काळात पत्रकार संघाने केलेले कार्य शासनाने देखील मान्य केले आहे. या ऐतिहासिक अधिवेशनाचे आयोजन करण्यासाठी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या नेतृत्वाखाली विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, जिल्हाध्यक्ष डॉ. छबुराव ताके, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, अभयकुमार दांडगे आदींनी अथक परिश्रम घेतले. या सर्वांचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे आणि राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे यांनी विशेष कौतुक केले.आगामी ऑगस्ट महिन्यात विदर्भ विभागाचे अधिवेशन वाशिम येथे घेण्यात येणार असल्याचे निलेश सोमाणी यांनी जाहीर केले.

## हंगाम सुरू...पण ना पिक विमा,ना बोनस! शेतकऱ्यांची ओढाताण तीव्र

**मुल । प्रतिनिधी**

खरीप हंगामाचा धुरळा उडाला आहे. शेतीची कामं जोरात सुरू आहेत. बैल, यंत्र, पेरणीची लगबग, एकेक शेतकरी आपल्या जमिनीत गुंतलेला. पण या साऱ्या धावपळीमागे दडलेली आहे एक वेगळीच हकीकत ना मागील वर्षाचा पिक विमा मिळालाय, ना यंदाच्या हंगामात धान उत्पादकांना बोनस दिला गेलाय. त्यामुळे मुल तालुक्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत भरडला जात आहे.विदर्भातील धानाचे कोठार म्हणून परिचित असलेल्या मुल तालुक्यात खरीप हंगामात भातासह कापूस, सोयाबीन, तूर अशा पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड होते. यंदाही पावसाने सुरुवात चांगली केल्याने शेतकरी शेतीच्या कामात झोकून देत आहेत. मात्र, आर्थिक पाठबळ नसल्याने त्यांची अवस्था शेती करावी तरी कशी? अशी झाली आहे.

हंगाम सुरू असताना शेतकऱ्यांच्या हक्काच्या योजना वेळेत पोहोचल्या नाहीत, तर त्यांना कर्जबाजारीपणा, सावकारांची मदत घ्यावी लागते. या परिस्थितीला शासनच जबाबदार असल्याचा सूर शेतकऱ्यांमध्ये उमटू लागला आहे.

आजही शेतकरी निसर्गावर विश्वास ठेवून शेती करत आहे. चांगल्या पावसाची आणि उत्पादनाची आशा बाळगत आहे. पण शासनाने वेळेत साथ दिली नाही, तर त्याची सारी मेहनत वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.पिक विमा आणि बोनस ही शेतकऱ्यांची तातडीची गरज आहे. केवळ घोषणा न करता वेळेत प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. शेतकऱ्यांनी सरकारकडून आधार नाही तर विचार तरी अपेक्षित आहे!



> **"मागील हंगामातील पिक विमा अजूनही उर्वरित पात्र शेतकऱ्यांना मिळालेला नाही. शिवाय यंदा बोनसचंही वितरण झालेले नाही. शेतीचा हंगाम सुरू झाला असून बियाणं, खते, मशागत, मजुरी असे अनेक खर्च डोक्यावर आहेत. शासनाने वेळेत निधी दिला असता, तर शेतकऱ्यांची मोठी मदत झाली असती,**
> **गणेश खोब्रागडे (अध्यक्ष, सेवा सहकारी सोसायटी, जुनासुर्ला).**

## एस.बी.पाटील इंटरनॅशनल व पब्लिक शाळेला बेसबॉल राष्ट्रीय स्पर्धेत विजेतपद

### बंगळुरु येथे मुंबई ब्रेव्ह संघाचा १४-०२ ने पराभव; सोमवारी इंदापूरात मिरवणूक

**भिगवण । राजेंद्र शिंदे**

वनगळी (इंदापूर) येथील शहाजीराव पाटील विकास प्रतिष्ठान संचलित एस. बी. पाटील इंटरनॅशनल व पब्लिक शाळेच्या ११ वर्षाखालील मुलांच्या संघाने बंगळुरु येथे झालेल्या मेजर बेसबॉल स्पर्धेत प्रतिष्ठेचे राष्ट्रीय विजेतपद पटकावले. शनिवारी (दि. १४ जून) झालेल्या अंतिम सामन्यात या संघाने मुंबई ब्रेव्ह संघावर १४ - ०२ असा दणदणीत विजय मिळवत राज्याचे आणि विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले.

या विजयी संघात सार्थक माने, सार्थक रोकडे, अभिनव घाडगे, इंद्रनील घोगरे, रेयंश आगलावे, प्रज्वल शेटे, श्रीवर्धन ढुके, विराज भोंग, स्वराज भोंग, यशराज मारकड, रोहन देवकाते, सुशांत कोळेकर या विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला. या सर्वांना साहिल बागवान, सचिन फुले, राहुल धोतरे व सौरभ






बोराटे या क्रीडा मार्गदर्शकांचे मोलाचे प्रशिक्षण लाभले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, सचिव भाग्यश्री पाटील, उपाध्यक्षा अंकिता पाटील ठाकरे, विश्वस्त राजवर्धन पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष देवकर यांनी सर्व विजेत्यांचे व प्रशिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

या विजयाच्या पार्श्वभूमीवर आणखी एक गौरवाची बाब म्हणजे मुख्य प्रशिक्षक साहिल बागवान यांची निवड अखिल भारतीय ११ वर्षाखालील बेसबॉल संघाच्या प्रमुख मार्गदर्शकपदी (प्रमुख प्रशिक्षक) झाली आहे. हा संघ भविष्यात भारताचे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करणार आहे.बेसबॉल या खेळाला सध्या जागतिक स्तरावर विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, अशा स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांची मिळवलेली कामगिरी निश्चितच गौरवास्पद आहे. या पार्श्वभूमीवर विजयी संघाचे स्वागत सोमवार (दि. १७ जून) रोजी इंदापूर येथे भव्य मिरवणुकीने करण्यात येणार आहे. ही मिरवणूक इंदापूर आय. कॉलेज ते बाबा चौक या मार्गावर दुपारी १२ वाजता निघेल. त्यानंतर एस. बी. पाटील इंटरनॅशनल शाळा, वनगळी येथे दुपारी १ वाजता खेळाडूंना गौरविण्याचा समारंभ होणार आहे.

## लोकनेते व्यंकटराव हिरे कनिष्ठ महाविद्यालयात बारावीतील विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत



**नाशिक । प्रतिनिधी**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कनिष्ठ महाविद्यालय, पंचवटी येथे नवागत इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या स्वागत समारंभाचे आयोजन प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सुचिता सोनवणे होत्या. त्यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी बारावीच्या शैक्षणिक वर्षाचे महत्त्व, अभ्यासाची आखणी, तसेच भविष्यातील शैक्षणिक आणि करिअरविषयक दिशा याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आर. बी. शिरसाठ यांनी केले तर आभार प्रा. सचिन सोनवणे यांनी मानले. या प्रसंगी विज्ञान शाखा प्रमुख प्रा. सुदाम भदाणे, वाणिज्य शाखा प्रमुख प्रा. एस. पी. पवार, कला शाखा प्रमुख प्रा. विजयसिंग कचवे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## गोळवाडी जि.प.शाळेत विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप

### नवख्यांचे स्वागत, ग्रामपंचायतीचा सहभाग



**वैजापूर । प्रतिनिधी**

दि. १६ जून (सोमवार) रोजी गोळवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ उत्साहात झाला. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. नव्याने पहिली वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने विशेष सत्कार करून त्यांचे स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमावेळी गावातील नवनिर्वाचित ग्रामसेवक शर्मा मॅडम यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत प्रेरणादायी विचार व्यक्त केले. यावेळी ग्रामपंचायत सरपंच भाऊसाहेब पाटील शिंदे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करण्यात आली. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना आहारही पुरविण्यात आला.कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका डिके मॅडम यांच्यासह शिक्षक आहेर, पगार, काळे, चव्हाण, आळंजकर आदी मान्यवर उपस्थित होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील पगार, उपाध्यक्ष गणेश मिसाळ, तसेच भीमराज पगार, साईनाथ पगार, डिगंबर वाकचौरे, ज्ञानेश्वर पगार (ग्रामपंचायत संगणक चालक), बाबासाहेब शिंदे, केशव शिंदे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.गावकऱ्यांचा आणि ग्रामपंचायतीचा असा सकारात्मक सहभाग शाळेच्या विकासासाठी प्रेरणादायी ठरत असून विद्यार्थ्यांना भावनिक व शैक्षणिक आधार देणारा आहे.

## ज्ञानविकास विद्यालयात विद्यार्थ्यांचे वह्या आणि खाऊ देऊन स्वागत

### अशोकदादा गरुड शैक्षणिक समूहाचा स्तुत्य उपक्रम

**पिशोर । जावेद शेख**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त देशभरात विविध ठिकाणी विद्यार्थ्यांचे स्वागत विविध पद्धतीने करण्यात येत आहे. याच अनुषंगाने अशोकदादा गरुड शैक्षणिक समूह संचलित ज्ञानविकास विद्यालय, भराडी येथे विद्यार्थ्यांचे खास स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना वह्या, रजिस्टर तसेच खाऊ वाटप करून शैक्षणिक वर्षाची सुरुवात गोड करण्यात आली. या उपक्रमात शैक्षणिक संस्थेचे प्रमुख अशोकदादा गरुड, सौ. शिल्पाताई गरुड आणि श्रुतीताई गरुड विशेष उपस्थित होते.कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवर्ग, पालक, तसेच शालेय वाहनांचे चालक व मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि नव्या वर्षाच्या सुरुवातीचा उत्साह दिसून येत होता.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .